# KMM 2016 Session 1: मी कोण आहे?

## रुपरेखा

| | |
|---|---|
| भाग १ : सुरुवात | (0२ मिनिट) |
| भाग २ : शिक्षण हे एक साधन आहे | (१२ मिनिट) |
| भाग ३ : आपण आपल्या आयुष्याचे निर्माते असतो | (१२ मिनिट) |
| भाग ४ : जिनिअस व्यक्तीचे गुण | (0४ मिनिट) |
| भाग ५ : त्यासाठी पुरावे | (0३ मिनिट) |
| भाग ६ : गृहपाठ | (0३ मिनिट) |
| भाग 7 : उजळणी | (0४ मिनिट) |

## भाग १ : सुरुवात

सर्वात खोडकर कोण आहे ?

सर्वात हुशार कोण आहे ?

सर्वात खेळकर कोण आहे ?

सर्वात फिल्मी कोण आहे ?

तुमचं नाव आणि KMM बद्दल तीन वाक्य.

## भाग २ : शिक्षण हे एक साधन आहे.

२ प्रश्न.

तुमच्या शाळेचं नाव हेच आहे ना ?________________________________

हा ______ वर्ग आहे ना ? झकास ! मग मी योग्य ठिकाणी आहे.

चला मुकनाट्याचा खेळ खेळू. मी खुणा केलेली वाद्ये ओळखा.

1. ड्रम्स
2. तबला

3. गिटार
4. व्हायोलिन

माध्यमातून सुरस गीत निर्मिती करतात तसेच आपण प्रत्येक जण वेगळे असतो तरी सुंदर जीवाची निर्मिती करु शकतो. आपल्यातील प्रत्येकजण जिनिअस आहे.

जल, पाणी, नीर, तन्नी, water भाषा वेगळी असली तरी अर्थ एकच आहे. आपलं ही असेच आहे.

आपण आपल्यातील जिनिअस कसा शोधायचा ?

- आपल्यातील काहींना तो आभ्यासातून सापडेल. मला काही उदाहरणे देऊ शकाल. उदा. ए.पी.जे.अब्दुल कलाम

- काहींना तो कलेतून सापडेल. उदा. चित्रकार- एम्.एफ.हुसेन,

- नृत्य- मायकेल जॅक्सन, शामक दावर

- काहींना तो खेळात सापडेल. उदा. क्रिकेट - तेंदुलकर, कोहली, फुटबॉल – मेस्सी, बॅडमिंटन - सायना नेहवाल...

जन्मत: कोणीच वृक्ष नसतो. जाऊन विचारा जन्मताना कोणी मोठा माणूस जन्माला आलाय का ?

जसे झाड हे एका छोट्या बी पासून बनते तसेच प्रत्येकामध्ये एक जिनिअसचं बी असते. ह्या बी चा वृक्ष कसा बनवायचा. तर आयुष्यात गुणांचे संगोपन करुन.

मायकेल जॉर्डनची कथा : महत्व वाढवणे.
(साहित्य : प्रत्येकजण जुने न्यूजपेपर घेऊन जातील.)

आपणच आपली किंमत ठरवू शकतो. पण आपला आपल्यावर विश्वास नसतो. कसे ते पाहू ?

## भाग ३ : आपण आपल्या आयुष्याचे निर्माते असतो.

माणसांना सोयीस्कर गोष्टी निवडायची सवय असते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींची नोंद आपण घेत नाही. त्याऐवजी आपल्याला आवडणाऱ्या आणि सोयीच्या गोष्टींची नोंद आपण पटकन घेतो.

Activity: आजूबाजूच्या निळ्या गोष्टी लक्षात ठेवा आणि आता गोल गोष्टी कोणत्या होत्या ते सांगा.

जेव्हा आपल्याला आपले मन कसे विचार करते ते समजते तेव्हाच हे कळते की, एकच परिस्थिती काही व्यक्तींना चांगली

तर काहींना वाईट दिसू शकते. परिस्थिती तीच असते. आपल्या पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक किंवा नकारात्मक असतो. आपण ठरवलं तर आपल्याला असणारी प्रबळ इच्छा आणि सकारात्मक मानसिकता एकाच परिस्थितीला नकारात्मकतेतून सकारात्मक बनवू शकते.

एका स्पर्धेमध्ये यशस्वी ठरलेल्या विजेत्यांची नावे एका कागदावर लिहून त्या कागदाचा लिलाव केला असता त्याला थोडी किंमत आली पण जेव्हा ह्या लिलावातून येणारे पैसे चांगल्या कामासाठी दिले जातील असे जाहीर झाले तेव्हा तीच किंमत कैक पटीने वाढली. कागद तोच होता पण उद्देश बदलला की किंमत बदलली.

कृती - रुमाल

कृती - जुन्या पेपर पासून वस्तू बनवणे.

## भाग ४: जिनिअस व्यक्तीचे गुण

हाड मोडलेल्या व्यक्तीला मला बँडेज बांधायचे आहे आणि माझ्याकडे प्लॅस्टर नाही. तुम्ही काय कराल ?

उंचीने लहान असलेली व्यक्ती उंची वाढवण्यासाठी काय करेल ?

मला बसायला जागा ठेवण्यासाठी मी बसमध्ये रुमाल टाकतो.

मला केस नाहीत मी वीग वापरतो.

मला क्रिकेट खेळायच आहे पण बँट नाही काय करु ?

## भाग ५ : त्यासाठी पुरावे

चालायला शिकलेले प्रत्येक मुल जिनिअस असते.

प्रत्येक मन जे वाचू-लिहू शकते ते जिनिअस असते.

तुमची प्रत्येक नवीन कृती तुमच्या हुशारीचा पुरावा असते.

आपल्याला जन्मत: मिळालेल्या ह्या गुणांकडे आपण का दुर्लक्ष करतो. आपला आपल्यावरील विश्वास आपण केव्हा का कमी करतो. कारण आपल्याला असे वाढवण्यात आले आहे फक्त परिक्षेतील चांगले मार्क आणि जिनिअस हा दुसराच कोणीतरी आहे. आपल्या विद्यार्थ्यांना हे पटु दे की मानवी मेंदूत प्रचंड ताकद आहे त्याचा वापर कसा करायचा ह्यावर विश्वास हवा. त्यांना हे पटवून सांगा की फक्त अलबर्ट आईन्स्टाईन किंवा इतर अश्या व्यक्तीच नव्हे तर प्रत्येक मानव हा जन्मत: 'जिनिअस' असतो.

जिनिअस नेहमी अडचणींवर उत्तर शोधतात ते थांबत नाहीत किंवा अर्धवट सोडून देत नाहीत

तुम्ही दु:खी असताना तुम्हाला कोणी आनंदी करत असेल तर तो जिनिअस नाही का ?

आपल्या आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर अनेक पर्याय आपल्यासाठी उपलब्ध असतात. अशावेळी योग्य निवडायची हिंमत दाखवणं आपलं भविष्य ठरवते. आपले निवडीचे निर्णय घेताना मनांत असणाऱ्या शंका, भिती यांना आपण महत्व दिले तर

आपल्यासमोर योग्य मार्ग असून सुद्धा तो निवडण्याची हिंमत आपण दाखवत नाही आणि अपयशाला सामोरे जातो.

मुलांना बॉस, भाई, हिरो, चॅम्पियन, राजे ह्या उपाधींनी संबोधा.

## भाग ६ : गृहपाठ

प्रत्येक चुकीच्या गोष्टीला नाही म्हणणारा आणि योग्य गोष्टीला स्विकारणारा व्यक्तीच जिनिअस असतो.

चूक आणि बरोबरची यादी बनवा.

तुमच्या सुवर्ण स्पर्शाने लोकांच्या आयुष्यात आनंद येऊ दे तर तुम्ही खरे जिनिअस.

## भाग 7 : उजळणी